मंत्रालयीन सेवा
जनहिताय सर्वदा

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

इतर मागास बहुजन कल्याण विभाग
नवीन प्रशासकीय इमारत ३,मजला,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.

---

क्रमांक- शिवृत्ती २०२६/प्र.क्र.१५/शिक्षण-२ दिनांक : २० एप्रिल ,२०२६

प्रति,

संचालक,
इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय,पुणे.

विषय :- सन २०२६-२७ करिता विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांची परदेशी शिष्यवृत्तीकरिता निवड करणेसाठी जाहिरात प्रसिध्द करणे.

संदर्भ:- आपले पत्र क्र.इमावबकसं/ परदेशशिष्य./ जाहिरात नमुना/ २०२६-२७/ १३९८,दि.०५.०३.२०२६.

महोदया,

राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील मुलामुलींना परदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना सन २०२६-२७ साठीच्या जाहिरातीच्या मसुद्याला मंजूरी प्रदान करणेबाबतचा प्रस्ताव शासनास संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त झाला आहे.

२. यासंदर्भात नमूद करण्यात येते की, परदेश शिष्यवृत्ती योजनेची सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठीची जाहिरात एप्रिल महिन्यात तातडीने प्रसिध्द करणे आवश्यक आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागातील परदेशी शिक्षणासाठीच्या शिष्यवृत्तीची जाहिरात नामांकित वृत्त पत्रात, इलेक्ट्रॉनिक मिडिया, समाजमाध्यम व अन्य माध्यमाद्वारे व्यापक प्रमाणावर तसेच या विभागाच्या व संचालनालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी. विभागाच्या व संचालनालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करत असताना सोबत अर्जाचा नमूना, विहित अटी शर्तीची यादी व संबंधित सर्व शासन निर्णय जोडण्यात यावेत. जोडल्यानुसार सुधारीत जाहिरातीच्या मसुद्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. जाहिरात प्रसिध्द करताना सुसूत्रता ठेवणे, प्रशासकीय विलंब टाळणे, या शिवाय शिष्यवृत्तीची रक्कम वितरीत करण्यामध्ये होणारा विलंब टाळण्याच्या दृष्टीकोनातून खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

I. परदेश शिष्यवृत्ती योजनेकरिता इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे कार्यालयात स्वतंत्र कक्षाची स्थापना करण्यात यावी. तसेच परदेश शिष्यवृत्ती योजना सन २०२६-२७ साठी दिनांक २२ एप्रिल २०२६ रोजी जाहिरात प्रसिध्द करुन दिनांक २१ मे, २०२६ पर्यंत विद्यार्थ्याकडुन ऑनलाईन/ ऑफलाईन अर्ज मागविण्यात यावेत. संपूर्ण महाराष्ट्र राज्याकरिता केवळ एकच जाहिरात इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे या कार्यालयामार्फतच प्रसिध्द करण्यात यावी.

II. परदेश शिष्यवृत्ती योजनेबाबतची गृहचौकशी वगळता अन्य सर्व कामे इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे मार्फत हातळण्यात यावीत.

III. विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्तीसाठी प्राप्त अर्जाची आपल्या अध्यक्षतेखालील समिती मार्फत छाननी करुन पात्र विद्यार्थ्यांचे प्रस्ताव प्रधान सचिव (इ.मा.ब.क.) यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीकडे अंतिम करण्यासाठी शासनास सादर करावेत.

सोबत -: सुधारीत जाहिरातीचा मसूदा.

PAL 20/04/2026

(डॉ.प्रिया देशपांडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

## विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील मुला-मुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजनेतंर्गत सन २०२६-२०२७ या वर्षासाठी जाहिरात.....

परदेशामध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रवेश मिळालेल्या महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असलेल्या विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील मुला-मुलींना परदेशी शिष्यवृत्ती योजनेतंर्गत निवडीसाठी सन २०२६-२७ साठी खालीलप्रमाणे शाखानिहाय/ अभ्यासक्रमनिहाय ७५ पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन तसेच ऑफलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | शाखा | मंजूर विद्यार्थी संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | पदवी/ पदव्युत्तर | पीएचडी | एकुण |
| १ | अभियांत्रिकी | २० | ५ | २५ |
| २ | वास्तुकलाशास्त्र | ४ | २ | ६ |
| ३ | व्यवस्थापन | २ | १ | ३ |
| ४ | विज्ञान | १० | ५ | १५ |
| ५ | वाणिज्य/अर्थशास्त्र | ४ | ५ | ९ |
| ६ | कला | ४ | ५ | ९ |
| ७ | विधी | ४ | १ | ५ |
| ८ | औषधनिर्माण शास्त्र | २ | १ | ३ |
| एकुण | | ५० | २५ | ७५ |

**<u>शिष्यवृत्तीसाठी पात्रतेचे निकष:-</u>**

- विद्यार्थी विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील महाराष्ट्र राज्याचा कायम रहिवासी असावा.
- पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ३५ वर्षे व पीएचडीसाठी ४० वर्षे ही कमाल वयोमर्यादा राहील.
- विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे सन २०२५-२६ चे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाखापेक्षा जास्त नसावे. टिप पुढीलप्रमाणे :-
  (विद्यार्थी किंवा पालक किंवा दोन्ही नोकरीत असतील तर त्यांचे आयकर विवरण व फॉर्म नं. १६ उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल. तसेच इतरांकरीता सक्षम प्राधिकारी (तहसिलदार किंवा नायब तहसिलदार पेक्षा कमी) दर्जा नसलेल्या ) यांच्याकडील मागिल आर्थिक वर्षाचे कुटुंबाचे सर्व मार्गानी मिळणाऱ्या उत्पनाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.)
  (विवाहित महिला उमेदवारांसाठी पतीकडील कुटुंबाचे एकत्रीत वार्षिक उत्पन्न दाखविणे आवश्यक आहे.)
  (जर अर्जदार स्वतः किंवा अर्जदाराचे आई वडील विधवा, परित्यक्ता, घटस्फोटीत, पती/पत्नीपासून विभक्त राहत असल्यास कायदेशीर कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.)
  (विद्यार्थी नोकरी करीत असल्यास स्वत:च्या उत्पन्नाचा समावेश कुटुंवाच्या एकत्रीत वार्षिक उत्पन्नात करणे आवश्यक आहे.)
  (महिला उमेदवार विधवा, परित्यक्ता, घटस्फोटीत किंवा पती पासून विभक्त असल्यास जर वडीलांकडे वास्तव्यास असेल तर वडीलांकडील कुटुंबाचे एकत्रीत वार्षिक उत्पन्न दाखविणे आवश्यक आहे.)
- एका कुटुंबातील जास्तीत जास्त दोन मुलांना परदेश शिष्यवृत्तीचा लाभ देता येईल. त्यापेक्षा जास्त मुलांना परदेश शिष्यवृत्ती लागू राहणार नाही. यासाठी पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी तसे प्रतिज्ञापत्र करुन देणे बंधनकारक असेल.
- भारतातील मान्यता प्राप्त विद्यापीठांमधून पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदवीका अभ्यासक्रमासाठी पदवी/ पदवीका परिक्षेत व पीएचडी साठी पदव्युत्तर परीक्षेत किमान ५५% गुण असणे आवश्यक आहे. परदेशातील शिक्षण संस्था ही जागतीक क्रमवारीत (QS World University Rank) २०० च्या आत असणे आवश्यक आहे.
- ज्या विद्यार्थ्यांना पदरेशी शैक्षणिक संस्थांकडून Unconditional Offer Letter मिळालेले असेल, त्याच विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती अनुज्ञेय राहील, यासाठी Conditional Offer Letter गृहीत धरले जाणार नाही.
- या योजनेतंर्गत विद्यार्थ्यांना मिळणारे लाभ व इतर अटी शर्ती शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार लागू राहतील.
- इतर अटी व शर्ती ह्या सविस्तर जाहिराती प्रमाणे तसेच, या विभागाच्या शासन निर्णय दिनांक ११.१०.२०१८ , सामाजिक न्याय विभागाच्या शासन निर्णय दिनांक ३०.१०.२०२३ व दिनांक २५.०७.२०२४ तसेच नियोजन विभागाच्या दिनांक २०.०७.२०२३ च्या शासन निर्णयानुसार लागू राहतील. शासन निर्णय क्र. शिवृत्ती-२०२२/प्र.क्र.१५/शिक्षण-२ दि. १३.१०.२०२२ मधील तरतूदीन्वये एकदा निवड झालेले विद्यापीठ व अभ्यासक्रम कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाही. अपवादात्मक परिस्थितीत उपरोक्त तक्त्यात नमूद अभ्यासक्रम / शाखानिहाय एकूण जागा, पात्रतेचे निकष, अटी व शर्ती व विद्यार्थ्यांना मिळणारे लाभ या मध्ये बदल करण्याचे अधिकार निवड समितीस / शासनास राहतील.

अर्ज /कागदपत्रे सादर करण्याची कार्यपध्दती :-

- इच्छूक विद्यार्थ्यांनी https://fs.maharashtra.gov.in या वेबसाईट वर ऑनलाईन तसेच ऑफलाईन अर्ज भरावा व सर्व कागदपत्रे ऑनलाईन / ऑफलाईन संलग्न करावी. विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन तसेच ऑफलाईन दोन्ही पध्दतीने स्विकारण्यात येतील.
- परदेशी शिष्यवृत्तीसाठीचे आवश्यक शासन निर्णय, अर्जाचा नमुना, कागदपत्रांची यादी, शिष्यवृत्तीसाठी पात्रतेच्या अन्य महत्वाच्या अटी शर्ती इ. सविस्तर माहितीसाठी पुढील संकेतस्थळाला भेट द्यावी. https://obcbahujankalyan.maharashtra.gov.in व https://dirobbwd.maharashtra.gov.in
- इच्छूक विद्यार्थ्यांनी https://fs.maharashtra.gov.in या वेबसाईट वर ऑनलाईन अर्ज भरावा व सर्व कागदपत्रे ऑनलाईन/ऑफलाईन संलग्न करावीत. तसेच, सदरील वेबसाईट वरुन अर्ज डाऊनलोड करुन तो परिपूर्ण व आवश्यक त्या सुस्पष्ट, वाचनीय self attested कागदपत्रासह दि.      /०५/२०२६ पर्यंत सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत संचालक, इतर मागास बहुजन कल्याण सचालनालय,पुणे, आकार प्रिमायसेस, दुसरा मजला एम.एच.बी.कॉलणी, शास्त्रीनगर, येरवडा, पूणे-४११ ००६. येथे सादर करावीत. त्यानंतर प्राप्त अर्जांचा विचार करता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

स्थळ :- पुणे                                                     दिनांक:     /०४/२०२६